ISBN : 978-93-83672-77-6



# सत्यशोधक अण्णा भाऊ साठे : बहुजनांचे कैवारी

संपादक

डॉ. मनिषा पाटील

अमोल महापुरे

कृष्णा आगे

Scanned with CamScanner

ISBN: 978-93-83672-77-6

# Index


१. अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय. ११

**प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत मारोतीराव**

२. साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाड्मय १४

**प्रा.डॉ.विजयेंद्र विश्वनाथ पाटील**

३. अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार १८

**प्रा. डॉ. गितांजली मोटे**

४. अण्णाभाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय २१

**प्रा.डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव**

५. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील लोकभक्ती व राष्ट्रभक्ती २८

**प्रा. नवनाथ ज्ञानोबा पवळे**

६. वैजयंता' नर्तिकेची शोककथा ३२

**प्रा. डॉ. भारत हंडिबाग**

७. अण्णा भाऊंचे पोवाडा वाड्.मय ४३

**प्रा.डॉ. एम.बी.धोंडगे, प्रा. उदार एन.एस.**

८. अण्णाभाउ साठे -मार्क्सवादी विचारवंत ४६

**डॉ. शेख हुसैन इमाम**

९. अण्णाभाऊ साठे : व्यक्ती आणि वाड्मय ४९

**प्रा.डॉ. अनिता परभतराव खंडागळे**

१०. अणाभाऊ साठे यांचे शाहीरी वाड्.मय आणि संगीत ५४

**रायबोले अर्चना रामरतन**

११. अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील स्त्री प्रतिमा ६२

**बेटकर वैशाली चनबस**

१२. अण्णाभाऊ साठे : परिवर्तनकारी व्यक्तित्व ६८

**प्रा. विवेकानंद हरिभाऊ चव्हाण**

१३. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजशास्त्र ७१

**डॉ. हनुमंत मिसाळ**

१४. महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचे व संस्कृतीचे पहिले प्रमुख चित्रणकर्ते : आण्णाभाऊ साठे ८१

**प्रा. जायेवार जगदिश लच्छमत्रा**




Scanned with CamScanner

ISBN: 978-93-83672-77-6

१.

# अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय.

**प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत मारोतीराव**
इतिहास विभाग प्रमूख, र.भ. अट्टल महाविद्यालय,गेवराई जि. बीड.

---

**प्रस्तावना :**

बहुजन समाजातील प्रचलीत अंधश्रद्धाळू भावना बदलून स्वाभिमानी बहूजन विचार समाजात रूजवनारा, बहूजनांची ओळख जगाला पटवून देणारा अशिक्षीतांपैकी महाराष्ट्रात शिवशाहीर अण्णा भाऊ साठे सारखा दुसरा महापुरूष आपल्या भूमीत झाला नाही.

अण्णा भाऊ साठे एकच असे महापुरूष आहेत की, ज्यांच्या जिवनावर शेकडो ग्रंथ, अनेक पीएच.डी., असंख्य कवीता-गीते नाटके-चित्रपट, पोवाडे निर्माण करण्यात आली आहेत. अण्णा भाऊ म्हणजे विविध पैलूंनी बहरलेले व्यक्तीमत्त्व होय. अण्णाचे कर्तृत्वच इतके महाण आहे की त्यांचे वर्णन करण्यत सर्व भाषेचे शब्दकोषही अपूरे पडतील त्यांच्यासाठी सर्व विशेषणे थिटे पडतील. अण्णा भाऊ सारखे महापुरूष जन्माला येणे म्हणजे त्या त्या देशाच्या जिवंत पणाचे लक्षण आहे. राष्ट्रनिष्ठा, देशप्रेम, मानवतावाद हे अण्णा भाऊंच्या जाज्वल्याचे जिवनकार्याचे अतूट अंग आहे.

अण्णा भाऊ साठेचे कार्य प्रत्येक क्षेत्रात होते. कोणत्याही विशीष्ठ क्षेत्रापूरते मर्यादीत नव्हते असे कोणते क्षेत्र असे नाही की, अण्णांनी त्यात योगदान दिले नाहीत. प्रत्यक्ष क्षेत्रात त्यांचे योगदान त्या-त्या क्षेत्रासाठी सर्वोच्च मार्गदर्शन म्हणून सिध्द झाले आहे. अण्णा भाऊ हे केवळ व्यक्ती नसून विचार आहे. तळागाळातील शोषीत लोकांकरीता प्रेरणा स्थान आहे. प्रेरणा केवळ वैचारीक पातळीपुरती मर्यादीत नसून झोपलेल्या समाजात स्वाभिमान, अस्मिता जागृत करणारे एक चालते बोलते विद्यापीठ आहे.

बांधवांनो अण्णा भाऊ साठे विषयी बोलायचे म्हटले तर भारतीयांना प्रशांत महासागराची खोली मोजता आली, हिमालय पर्वताची उंची मोजता आली. परंतु शिवशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या वैचारीक ज्ञानाच्या पातळीची कुणालाही खोली व उंची मोजता आली नाही. अशा या महामानवास कोटी कोटी प्रणाम.

**(२) अण्णा भाऊ साठेंचा जन्म :-**

शिवशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्म ०१ ऑगष्ट १९२० रोजी छोटेशा वाटेगाव ता. वाळवा जि. सांगली जिल्ह्यात वडील भाऊराव साठे व आई वालूबाई साठे यांच्या पोटी ब्रिटीश राज्यकर्त्यांने व सवर्णांनी गुन्हेगार म्हणुन शिक्का मारलेल्या मागासवर्गीय मातंग जातीतील एका अशिक्षीत कुटूंबात झाला. अण्णाभाऊंचे मुळ नाव तुकाराम भाऊराव साठे होते. त्यांना दोन पत्नी कोंडाबाई व जयवंताबाई अण्णाभाऊ साठे होत. यांच्या पोटी तिन आपत्य जन्माला आले. एक



Scanned with CamScanner

## (३) अण्णा भाऊ साठे यांचे लेखन :-

अण्णा भाऊ साठे हे अशिक्षीत असले तरी हरहुनेरी व्यक्तीमत्त्वाचे महापुरूष होते. अण्णा भाऊ साठे कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे प्रवासवर्णने अशा कितीतरी वेगवेगळ्या साहीत्य प्रकारातील लेखन केलेले ख्यातनाम मराठी, साहित्यिक आहेत. अण्णा भाऊंनी मराठीत एकूण पस्तीस कादंबऱ्या लिहीली आहेत. जनुकाही अण्णा भाऊंनी कथा-कादंबऱ्याचा पाऊस पाडला आहे. १९४५ ची पहीली चित्रा ही कादंबरी, फकीरा, वारणेचा वाघ चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ, वैजयंता टिळा लावते मी रक्ताचा, डोंगराची मैना, मुरली माल्हाररावाची अशी ही साताऱ्याची तरा अनेक कादंबऱ्या लीहीली आहेत. तर जगप्रसीध्द लोकनाट्यात मुंबई कुनची, अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, शेटजिचे इलेक्शन, बेकायदेशीर, पुढारी मीळाला, लोकमंत्र्याचा दौरा अशी प्रसीद्ध लोकनाट्य लीहीली शिवाय इनामदार पेंग्यांचे लगीन, सूलतान अशी प्रशिद्ध नाटके अण्णांनी लीहीली आहेत.

## (४) वाटेगाव ते मुंबईतील क्रांतीकारी प्रवास :

अण्णा भाऊ साठे हे हरहुनेरी व्यक्तीमत्वाचे होते. त्यांचे शालेय शिक्षण झाले नव्हते. पण अण्णा भाऊ बोलके प्रयत्नपूर्वक अक्षरज्ञान कला अवगत शिक्षीत होते. अण्णा भाऊ साठे चरीतार्थासाठी १९३२ साली वडीलासोबत वाटेगाव येथून मुंबईला आले होते. मुंबईत आल्यावर मिळेल ते काम व मिळेल ती नोकरी केली. मुंबईत कामगारांचे दुःखाचे-कष्टमय जीवन त्यांनी उघड्या डोक्यांनी पाहीले. कामगारांचे सत्यासाठी लाढाऊ वृत्तीने पुकारलेली संप, मोर्चे त्यांनी जवळून उघड्या डोळ्यांनी पाहीले आहेत. त्यामुळे त्यांच्यात लढाऊवृत्ती निर्माण झाली. १९३६ साली भारतीय कम्युनिष्ट पक्षाचे नेते कॉंग्रेट श्रीपाद अमृत डांगे यांची भेट झाली. त्यांचे कार्य त्यांना पसंत आले. त्यांच्या सोबत एकनिष्ठ काम करते वेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या सारख्याची भाषेने ऐकायला मीळाले. पुढे १९४२ च्या ब्रिटीश विरोधी भारत छोडो चळवळीत भाग घेतला. ब्रिटीश सरकार त्यांच्यावर पकडवारंट काढले. सरकारला व पोलीसाला चकवा देत देत मंबईत १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने 'लाल बावटा' कलापथक स्थापण केले. या कलापथकावर सरकारणे बंदी घातली. दरम्यान अण्णांची अमळनेरचे अमर हुतात्मे आणि पंजाब दिल्लीचा दंगा १९४७ साली काव्यरचना प्रसिध्द झाल्या आहेत.



Scanned with CamScanner

महाराष्ट्राच्या चळवळीत स्वतःला झोकून दिले. चळवळीत जिवंतपणा आणण्यासाठी अनेक पोवाडे लीहीली, मुंबई कोणाची या लोकनाट्याचे प्रयोग महाराष्ट्रभर केले गेली. त्याच बरोबर अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, पुढारी मीळाला अशी अनेक लोक चळवळीची प्रयोग महाराष्ट्रभर केली गेली आहेत. दलीत आणि श्रमीक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहात होते. त्यामुळे शासनांनी अण्णाभाऊंना उपेक्षित गुन्हेगार म्हणून जाहीर केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांच्या संस्काराची बिजारोपन अण्णाच्या मनावर खोलवर झाले होते. गरीब मानवाच्या जिवनातील संघर्ष, दुःख, दारीद्रय त्यांनी स्वतः जानलेले होते. त्यामूळे त्यांच्या जिवनातील जिवंत क्रांतीकारी प्रवास त्यांना शांत बसू देत नव्हता. अण्णा भाऊ म्हणजे भारतीय कम्यूनिष्ठ पक्षाचा एक सांस्कृतीक शाखा होती. संयूक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. गोवा स्वातंत्र्य आंदोलनामध्ये हिरीरीने सहभाग घेतला होता. आण्णा भाऊ दलीत व कामगारावरील अन्याय पाहून यांच्या न्यायासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांन पाठोपाठ दलीतांना न्यायमीळावा म्हणून कार्य करत राहीले. या धगधगत्या क्रांतीकारी महापुरूषांच्या वाटेला मात्र पुढे पुढे दारीद्रय आणि एकाकीपणा त्यांच्या वाट्याला आला. निपन्नावस्थेत गोरेगाव मुंबई येथे १८ जूलै १९६९ रोजी त्यांचे निधन झाले.

**संदर्भ :**


१) केशव मेश्राम महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशन, लोकशाहीर आण्णाभऊ साठे, निवडक वाङ्मय मुंबई.

२) विजयकूमार जोखे - अण्णा भाऊ साठे चरीत्र आणि कार्य, नालंदा प्रकाशन.

३) बजरंग कोरडे - अण्णा भाऊ साठे - साहित्य अकादमी.




Scanned with CamScanner